म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क. ६२-५३

…य माला २१ वें



# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर

पांच

IRBK-0106253
IRBK-0106253

…य विद्यार्थी गृह … पुणें २.

वाचनालय क्रमांक ६२५९३

स्वाध्यायमाला : पुष्प २१० वें

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# पौष मास

२२५८०
१२५
३०.१२.५९

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

म. ग्रं. सं. ठाणे
पा. वा.
१२६

संपादक मंडळ

डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.), एम्. ईडी.
श्री. शं. दा. चितळे, एम्.ए., बी.टी., विशारद, कार्यकारी संपादक

१८७८ ]

किं.

[ १९५७

IRBK-0106253

सर्वाधिकार स्वरक्षित

आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडेकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.
(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.
(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.
(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं भेट देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास-यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

# पौष मास

पौष महिना आला हं. ह्या महिन्यांत लग्न मुंज वगैरे कार्यें करीत नसतात. म्हणून ह्याला शून्य महिना म्हणतात कधीं कधीं. परंतु तितका अगदींच शून्य महिना नाहीं हा. कारण त्याला धनुर्मास हें नांवहि दिलें जातें. ह्या महिन्यांत दररोज सूर्योदयापूर्वी ब्राह्मणांसह भोजन केलें तर नकळत घडलेल्या पापांचा नाश होतो, अशी समजूत आहे. शिवाय दिवाळीनंतरचा मोठा सण ह्याच महिन्यांत येतो. नि तो म्हणजे मकरसंक्रांत. एवढा एकच सण असल्यामुळें आधीं ह्याचीच माहिती घेऊं या. प्रारंभींच संक्रांतीच्या तिळगुळानें तोंड गोड केलेलें बरें !

## मकरसंक्रान्त

संक्रांत ठराविक तिथीलाच येते असें नाहीं. पण बहुधा शुद्ध त्रयोदशीला किंवा चर्तुदशीला येते.

पुराणांत अशी कथा आहे कीं, संक्रांतदेवीनें संकरासुराचा ह्या दिवशीं नाश केला. म्हणून जुने लोक तीर्थांच्या ठिकाणीं जाऊन नदींत स्नान करतात. त्यामुळें पाप धुऊन जातें असें मानतात. गंगायमुनांचा जिथें संगम होतो त्या प्रयागला ह्या दिवशीं हजारों लोक प्रयागस्नानासाठीं जातात.

परंतु, खरें म्हणजे मकरसंक्रांत हा निसर्गाचा सण आहे. ह्या दिवसापासून सूर्य उत्तरेकडे जाऊं लागतो. आपण सूर्याच्या गतीची बारा स्थानें मानतों. त्यांना राशि म्हणतात. ह्या बारा राशि पुढील-प्रमाणें आहेत. (१) मेष (२) वृषभ (३) मिथुन (४) कर्क (५) सिंह (६) कन्या (७) तूळ (८) वृश्चिक (९) धन किंवा धनु (१०) मकर (११) कुंभ व (१२) मीन.

ह्यांपैकीं दहाव्या म्हणजे मकर नांवाच्या राशींत सूर्य जातो ह्यालाच मकरसंक्रमण म्हणतात. एका वर्षांत सूर्य बारा राशींतून जातोसा दिसतो. वास्तविक सूर्य स्थिर असतो. पृथ्वीच सूर्याभोंवतीं फिरत असते; पण सूर्य फिरतो आहे असा भास होतो. म्हणून एका वर्षांत सूर्याचीं बारा संक्रमणें होतात. त्यांपैकीं मकर व कर्क हीं दोन संक्रमणें महत्त्वाचीं आहेत. कारण सूर्याच्या दोन गति असतात. एक उत्तरायणाचा आरंभ झाल्याचें सुचविते. आणि आषाढ महिन्यांतील कर्कसंक्रमण दक्षिणायनाचा आरंभ झाला हें सूचित करतें. उत्तरायणाला प्रारंभ झाला कीं, सूर्य उत्तरेकडे वळलेला दिसतो आणि हळूहळू दिवस मोठा होत जातो. नि रात्र लहान होत जाते. दक्षिणायनांत ह्याच्या उलट प्रकार होतो.

संक्रांतीच्या आदल्या दिवसाला भोगी म्हणतात. त्या दिवशीं तीळ लावलेली भाकरी, भरीत, दाण्यांच्या उसळी वगैरे खाण्याचा प्रघात आहे. दुसऱ्या म्हणजे संक्रांतीच्या दिवशीं सौभाग्यवती स्त्रिया सुगड पूजतात नि त्या दिवसापासून माघांतल्या रथसप्तमी-पर्यंत घरोघरीं हळदकुंकू करतात.

संक्रांतीच्या दुसऱ्या दिवसाला किंक्रांत किंवा कर म्हणतात. संक्रान्तीच्या सणांत तिळाचें फार महत्त्व असतें. तीळ व गूळ ह्यांचें

मिश्रण करण्यांत मार्मिकता दिसून येते. तिळांत स्निग्धता असते. स्निग्धता ह्याचे दोन अर्थ होतात. एक अर्थ म्हणजे तेलकटपणा. तिळाचें तेल काढतात हें प्रसिद्धच आहे नि दुसरा अर्थ म्हणजे स्नेह-मैत्री. तेव्हां अंगांत स्निग्धता--स्नेह--असलेल्या तिळांचें गुळाशीं मिश्रण मुद्दामच करतात. त्यामुळें स्नेहाची गोडी वाढावी हा हेतु असतो.

मग हा हेतु लक्षांत ठेवूनच तिळगुळाची देवाण-घेवाण नको का करायला? ज्या मित्राला किंवा मैत्रिणीला तिळगूळ द्यावयाचा



त्यांच्याशी कायमची मैत्री टिकावयाला हवी! एवढेंच नव्हे तर ज्या मित्राशीं भांडण असेल त्यालाहि संक्रांतीच्या दिवशीं मुद्दाम तिळगूळ द्यावा नि भांडणाचा कडवटपणा गोड तिळगुळांत विसरून टाकावा.

ह्या दिवसापासून दिवस तीळ, तीळ मोठा होऊं लागतो. म्हणूनहि कदाचित् त्याचें सूचक अशा तिळांचा उपयोग करण्याची पद्धत पडली असेल!

त्याचप्रमाणें तिळाचे पदार्थ उष्ण असतात. म्हणून ह्या थंडीच्या दिवसांत तिळाचे लाडू, वड्या वगैरे प्रकृतीला हितकारक

ठरतात. मात्र ह्या वस्तु बेतानेंच खावयाला हव्यात. चांगल्या गोष्टींचासुद्धां अतिरेक होऊं शकतो नि तो बाधक ठरतो !

एकंदरींत संक्रांतीच्या सणामुळें सर्वांनाच मोठा हुरूप वाटतो. पहांटे उठून तिळगुळाला कांटा आणण्याचा बोवाळहि मौजेचा असतो. तशीच हळदीकुंकवाची ती धांदल. नि गांवोगांवीं असलेल्या नातलगांना किंवा मित्रांना लहानशा पिशव्यांतून तिळगूळ धाडावयाला मोठीच गंमत वाटते. आजकाल पिशव्यांऐवजीं तिळगुळाचीं भेटकार्डें पाठवितात. नि त्याला चिकटविलेल्या चिमुकल्या पाकिटांत चार तिळगूळ घालतात. बस्स ! तोंड गोड करावयाला चार तिळगूळहि पुरेसे आहेत.

मुलें स्वत: अशीं भेटकार्डें तयार करतात नि आपापल्या कल्पनाशक्तीची छानदार करामत दाखवितात.

कांहीं ठिकाणीं तिळगुळाबरोबर गुपित हलवा करण्याची पद्धत असते. बदाम, पिस्ते, भोंपळ्याच्या बिया, लवंगा, वेलदोडे ह्या जिन्नसा पाकांत घोळवून त्यावर कांटा चढवितात. साहजिकच हा गुपित हालवा छानच लागतो नि कधीं कधीं वरच्या साखरेच्या आवरणाखालीं कोणता जिन्नस लपलेला आहे तें पटकन् उमगत नाहीं. म्हणून त्याला गुपित हलवा म्हणतात.

आपल्या इथें पौराणिक कथेंत संक्रान्ति देवी मानली आहे. आणि दरवर्षीं ती वेगवेगळ्या वाहनावर स्वार होऊन येते असें मानतात नि त्यावरून ज्योतिषी लोक वर्षाचें भविष्य सांगतात. कधीं कधीं संक्रान्तिदेवीचें वाहन हत्ती असतें नि उपवाहन—जोडवाहन—गाढव असतें; तर केव्हां वाहन सूकर—डुक्कर—असून उपवाहन बैल असतो. तिचें वस्त्रहि निरनिराळ्या रंगांचें असतें. ती कधीं तरुण, कधीं पोक्त तर कधीं म्हातारी असते. तिला ज्या

गोष्टी आवडतात त्या महाग होतात असें मानतात. त्याचमुळें आपल्यामध्यें 'संक्रान्त वळणें' हा शब्दप्रयोग रूढ झाला आहे. त्याचा अर्थ संकट ओढवणें असा समजला जातो.

संक्रांतीच्या सुमाराला पतंग उडविण्याला ऊत येतो; पण आयते पतंग मुलें विकत आणतात. त्याऐवजीं त्यांनीं स्वतः पतंग बनवावे. ही कला तर आहेच; पण तें शास्त्रहि आहे. विशिष्ट रीतीनें बनविलेला पतंगच उंच जातो. त्याचें वजन नीट जमलें नसलें तर तो गोते खातो. तेव्हां ह्या सणाच्या निमित्तानें मुलींनीं तिळगूळ व गुपित हलवा करण्याची कला शिकून घ्यावी आणि मुलांनीं पतंग बनविण्याची कला हस्तगत करावी.



अशा रीतीनें संक्रांतीचा सण साजरा केला तर करमणूक नि ज्ञान हीं दोन्हीं एकदम मिळतील. मौजहि केली नि कलाहि शिकून घेतली, अशी आपल्या रोजनिशींत नोंद करतांना केवढा आनंद वाटेल !

पौष महिन्यांतील ह्या एकुलत्या एका सणाची माहिती कळली तुम्हांला. आतां ह्या महिन्यांतील इतर महत्त्वाच्या दिवसांचा विचार करूं या.

**विवेकानंद जयंति**

ह्यानंतर वद्य अष्टमीला स्वामी विवेकानंदांची जयंति येते. विवेकानंदांना अर्वाचीन संत म्हणावयास हवें. प्राचीन म्हणजे पूर्वीच्या काळांतील; तर अर्वाचीन म्हणजे अलीकडील काळांतील. विवेकानंद १९०२ सालीं वारले.

अशा हल्लीं होऊन गेलेल्या संताबद्दल साहजिक वेगळीच आपुलकी वाटते. तो आपल्यापैकींच होता अशी भावना असते. त्याचें चरित्र आपल्याला जवळचें भासतें. त्यानें जें केलें तें अशक्य कोटींतील असणार नाहीं, असा विश्वास वाटतो. थोड्याफार प्रमाणांत आपण त्याचें अनुकरण करावें, अशी इच्छा उत्पन्न होते.



स्वामी विवेकानंद

विवेकानंदांनीं पुष्कळ केलें; आपण थोडे तरी करूं या, एवढी आवड मनांत उत्पन्न झाली तरी ह्या संताची जयंति उत्तम साजरी झाली असें म्हणावयाला हरकत नाहीं.

आतां असें काय काय केलें ह्या विवेकानंदांनीं? त्यांनीं शिक्षण व्यवस्थित घेतलें. ते खरेखुरे विद्यार्थी होते. विद्या मिळविण्याची त्यांना विशेष आवड होती. निव्वळ परीक्षार्थी नव्हते ते. म्हणजे नुसत्या परीक्षा पास होण्यासाठीं ते शिकत नव्हते.

ह्याशिवाय त्यांनीं गायनविद्या शिकून घेतली होती. शरीर उत्तम कमाविलें होतें. व्यायामाचा त्यांना नाद होता.

ज्या तरुण वयांत मौजमजा करावयाची त्या वयांत त्यांनीं संन्यास घेतला. रामकृष्ण परमहंस ह्यांना आपले गुरु केले.

विवेकानंदांनीं सबंध भारतांत तर प्रवास केलाच. पण ते अमेरिकेला गेले नि तिथल्या सर्वधर्मपरिषदेंत सभा जिंकून आले.

१८९३ सालीं अमेरिकेंत ही सर्व धर्मांची परिषद भरली होती. विवेकानंदांच्या गुरुपत्नीनें त्यांना पत्र धाडलें आणि अमेरिकेला जा, असा सल्ला दिला. कारण शारदादेवीला-गुरुपत्नीला-तसा रामकृष्ण परमहंसांचा साक्षात्कार झाला होता.

मग विवेकानंदांच्या श्रीमंत शिष्यांनीं पैशाची व्यवस्था केली आणि विवेकानंद अमेरिकेला गेले.

त्या धर्मपरिषदेला निरनिराळ्या देशांतून प्रतिनिधि आले होते. ख्रिश्चन धर्मांतील निरनिराळ्या पंथोपपंथांतील धर्मगुरु मखमलीचे झगे पांघरून बसले होते. बाजूला चीन, जपान, इराण, हिंदुस्थान इत्यादि देशांतील प्रतिनिधि बसले होते.

आधीं इतर व्यक्तींचीं भाषणें झालीं. नंतर विवेकानंदांना भाषण करण्यास सांगितलें. तो देश परका, भोंवतीचीं माणसें परकीं, आणि परक्या इंग्रजी भाषेंत भाषण करावयाचें !

ही विवेकानंदांच्या धैर्याची कसोटीच होती. पण त्याही-पेक्षां आपल्या मातृभूमीचा गौरव ह्यावर अवलंबून आहे, ही जाणीव त्यांना विशेष होत होती ! म्हणून आपली सारी विद्वत्ता त्यांना पणाला लावावयाची होती !

मग त्यांनीं भाषणाला सुरुवात केली. इतर वक्त्यांप्रमाणें त्यांनीं आपलें भाषण पाठ केलेलें नव्हतें. त्यांत जाडच्या-जाडच्या शब्दांची आतषबाजी नव्हती. केवळ भावनेचा नंदादीप त्यांत तेवत होता. विवेकानंदांच्या हृदयांतून शब्द निघत होते नि श्रोत्यांच्या हृदयांत ते पोंचत होते.

त्यांनीं हिंदु धर्माचा मोठेपणा उलगडून सांगितला. देव सर्वत्र आहे. सर्व धर्मांत देवाकडे जाण्याचे मार्ग सांगितले आहेत. मग एकमेकांच्या धर्माचा द्वेष कां करा ? तसेंच सर्व

धर्मांना मान देण्याचें तत्त्व हिंदु धर्मानेंच सर्व धर्मांना शिकविलें आहे. तेव्हां हिंदुधर्म म्हणजे सर्व धर्मांची माता आहे.

अशा तऱ्हेचें भाषण त्यांनीं केलें. श्रोत्यांना तें भारीच आवडलें. अगदीं प्रारंभापासून शेवटपर्यंत आवडलें. इतर वक्त्यांनीं आपापल्या भाषणाचा प्रारंभ फार अवडंबरयुक्त शब्दांनीं केला होता. तोच विवेकानंदांनीं अतिशय सुटसुटीत प्रारंभ केला.

" अमेरिकेंतील माझ्या बंधुभगिनींनो–" हा प्रारंभ होता तो. तो ऐकतांच श्रोत्यांनीं टाळ्या दिल्या नि त्याचक्षणीं त्यांनीं श्रोत्यांच्या चित्ताची पकड घेतली.

भाषण करणें——वक्तृत्व——ही मोठी कला आहे. वक्त्याच्या अंगीं अनेक गुण असावे लागतात. तरच त्याच्या वक्तृत्वाची छाप पडते. विवेकानंदांच्या अंगीं ते सर्व गुण होते.

मुख्य म्हणजे वक्त्याचें व्यक्तित्व प्रभावी असावें लागतें. वक्त्याची मुद्रा व शरीर रुबाबदार असावीं लागतात. निदान मुद्रा तरी तशी असावी लागते.

विवेकानंद तर नखशिखान्त रुबाबदार होते. त्यांचा केशरी पोषाक नि भगवा फेटा आकर्षक होता. त्यांचा उंच, मजबूत देहबांधा, कमलासारखे टपोरे, वाटोळे डोळे नि ब्रह्मचर्याचें तेज ह्या सर्वांची श्रोत्यांवर विलक्षण छाप पडली. त्यांतच त्यांनीं आपुलकीनें व सहजपणें भाषणाला सुरुवात केली. त्यांची ती राजेशाही मूर्ति श्रोत्यांच्या डोळ्यांना खेंचून धरीत होती नि त्यांची अस्खलित वाणी श्रोत्यांच्या कानांची पकड घेत होती. त्यांचें मुद्देसूद भाषण श्रोत्यांच्या हृदयाला भिडत होतें.

त्यामुळें विवेकानंदांनीं ती सभा जिंकली नि तिथें जम-

लेल्या त्या मोठमोठ्या राष्ट्रांत आपल्या मातृभूमीला मानाचें स्थान मिळवून दिलें. त्यांनीं मातृभूमीचें ऋण फेडलें.

पुढें हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं बेलूरला मठ स्थापन केला, अनेक शिष्य तयार केले आणि आपलें इथलें कर्तव्य आतां संपलें असें कळून येतांच समाधि घेतली.

अमुक दिवशीं आपण ह्या जगाचा निरोप घेणार, हें त्यांना आगाऊ कळलें होतें. त्यांनीं चार दिवस आधीं कॅलेंडरांतील जुलैच्या चार तारखेवर खूण केली होती. नंतर ते गंगेच्या काठीं शिष्यांसह फिरावयास गेले अन् तिथली सहा फूट लांब नि तीन फूट रुंद अशी जागा त्यांनीं शिष्यांना दाखविली होती. तिथें आपला देह जाळावा, असें त्यांनीं सांगून ठेविलें होतें. पुढच्या चार दिवसांत त्यांनीं नेहमींचीं सर्व कार्यें व्यवस्थित केलीं नि रात्रीं सव्वानऊ वाजतां बिछान्यावर पडल्या जागीं प्राण सोडला.

ह्याला इच्छामरण म्हणतात. इच्छा होईल त्यावेळीं मरणाला जवळ करावयाचें.

मरणाच्या वेळीं विवेकानंद फक्त ३९ वर्षांचे होते.

## निवृत्तिनाथ जयंति

आतां ह्यानंतर वद्य एकादशीला निवृत्तिनाथांची पुण्यतिथि येते. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे वडील भाऊ. ज्ञानेश्वर त्यांना आपले गुरु म्हणत. स्वतःला निवृत्तिदासु--निवृत्तीचा दास— असें म्हणवीत. तें योग्यच होतें.

निवृत्तिनाथांमुळें ज्ञानेश्वर एवढ्या थोर पदाला पोंचले. ज्ञानेश्वरांच्या कीर्तिमंदिराचा निवृत्तिनाथ हे पाया होते. हा पाया मजबूत होता म्हणून वरचें मंदिर एवढें टिकाऊ झालें !

पण जगाची रीतच उलटी ! जगाला वरचें मंदिरच तेवढें दिसतें. त्याचेंच मात्र त्यांना कौतुक वाटतें; पण पायाकडे त्याचें लक्षच जात नाहीं. जगाला ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी दिसते; पण तिच्या पाठीं असलेला निवृत्तिनाथांचा आधार नि सहानुभूति दिसत नाहीं.

निवृत्तिनाथांनीं वेळोवेळीं आपल्या ह्या धाकट्या भावाला धीर दिला. त्याला सांवरलें. निवृत्तिनाथ वडील भाऊ होते. वडील भावाच्या अंगावर केवढी जबाबदारी असते ! वडील भावाचें अनुकरण पाठचीं भावंडें करतात. तेव्हां लहान भावंडांना वडील भावानें उत्तम धडा घालून द्यावा लागतो !

तसा निवृत्तिनाथांनीं आपल्या भावंडांना धडा घालून दिला. ते त्यांना आईवडिलांच्या जागीं होते. ज्ञानेश्वरांच्या अंगांत अलौकिक शक्ति आहे, हें त्यांनीं ओळखलें आणि त्या शक्तीला योग्य वाव दिला. मी मोठा आहें. तेव्हां जगानें मलाच मोठें मानावयास हवें, असा स्वार्थ त्यांच्या मोठ्या मनाला शिवला नाहीं. खरेखुरे मोठे होते ते ! त्यांनीं ज्ञानेश्वरांना शक्य तेवढी मदत केली.

शेवटीं ज्ञानेश्वर समाधि घेण्यासाठीं गुहेंत उतरले तेव्हां स्वतः निवृत्तिनाथांनींच त्यांचा उजवा हात धरून त्यांना आंत नेलें. काय वाटलें असेल त्यावेळीं निवृत्तिनाथांना ? पाठचा भाऊ आधीं मरण पावणें, हें वडील भावाला मरणाहून अधिक दुःखदायक वाटतें !

बापड्या निवृत्तिनाथांना अशीं दुःखें तीनदां भोगावीं लागलीं. ज्ञानेश्वरांच्या मागून एकच महिन्यानें सोपानदेवानें सासवड मुक्कामीं समाधि घेतली. त्यामुळें धाकटी मुक्ताबाई फारच उदास झाली. त्या चौघां भावंडांच्या जणूं दोन जोड्या होत्या.

मोठीं दोघें--निवृत्ति व ज्ञानेश्वर--आणि धाकटीं दोघें--सोपान व मुक्ताबाई. आधीं निवृत्तिनाथांचा जोडीदार गेला आणि आतां मुक्ताबाईचा जोडीदार गेला.

नंतर नामदेवानें निवृत्तिनाथांना सुचविलें कीं, मुक्ताबाईला आपल्या जन्मगांवीं घेऊन जा. त्याप्रमाणें हीं दोघें भावंडें आपेगांवीं गेलीं. तिथलें घर व सगळ्या ओळखीच्या जागा पाहून त्यांना भडभडून आलें.

पुढें ४।६ महिन्यांनींच मुक्ताबाईहि निवृत्तिनाथाला नि ह्या जगाला सोडून गेली. तेव्हां त्यांना ब्रह्मांड आठवलें !

थोडक्या दिवसांच्या अंतरानें तिन्ही धाकटीं भावंडें त्यांच्या डोळ्यांदेखत समाधिस्थ झालीं. निवृत्तिनाथ कमालीचे उदासीन झाले. त्यावेळीं त्यांनीं पुढील उद्‌गार काढले :—

**ज्येष्ठाच्याही आधीं कनिष्ठाचें जाणें । केलें नारायणें उफराटें ।।**

खरोखर, हें उफराटें–उलटेंच–नव्हतें का झालें ? पण वडील भावंडाच्या अनेक कठिण कर्तव्यांतील एक कर्तव्य आहे तें ! धाकट्या भावंडांना कडेपर्यंत आधार द्यावयाचा मोठ्यानें ! तसा निवृत्तिनाथांनीं दिला. अत्यंत कटु कर्तव्य निमूटपणें पार पाडलें !

पण आतां ? आतां कोणासाठीं जगावयाचें त्यांनीं ? कोणाला आधार देणार होते ते आतां ? त्यांचा धीर आतां सुटला. पौष वद्य एकादशीच्या दिवशीं त्र्यंबकेश्वर येथें त्यांनीं समाधि घेतली.

चारहि भावंडें ह्या जगांतून गेलीं; पण कीर्तिरूपानें अमर राहिलीं. लहानथोर सर्वजण आदरानें अनेकदां त्यांची आठवण काढतात नि म्हणतात—निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ! एकनाथ, नामदेव, तुकाराम ।

चौघांपैकीं चारहि भावंडें संतपदाला पोंचलीं, हें केवढें नवल !

पण हें नवल असलें तरी त्याच्या मुळाशीं थोडया तरी अंशीं निवृत्तिनाथांचा कित्ता आहे !

**महात्मा गांधी पुण्यतिथि**

आतां एका महात्म्याची पुण्यतिथि साजरी करूं या. तो महात्मा म्हणजे महात्मा गांधी. पौषाच्या कृष्ण पंचमीला त्यांचा अन्त झाला !



पूज्य गांधीजी

महात्माजींचें सबंध नांव मोहनदास करमचंद गांधी. पोरबंदरला इ. स. १८६९ च्या ऑक्टोबरच्या २ तारखेला ते जन्मले.

तेरा वर्षांचे असतांना गांधीजींचा कस्तुरबांबरोबर विवाह झाला.

पुढें गांधीजी मॅट्रिकची परीक्षा पास झाले नि सहा महिने भावनगरच्या कॉलेजांत गेले; पण तिथलें जीवन त्यांना आवडेना. म्हणून ते राजकोटला परतले. नंतर कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं इंग्लंडला ते गेले.

तिथें मिसेस् ॲनी बेझंट नांवाच्या बाईशीं गांधीजींची ओळख झाली. ह्या बाईनीं ब्रह्मविद्येचा--ईश्वराबद्दल ज्ञान मिळविण्याचा--अभ्यास केला होता. तेव्हां गांधीजींना आपल्या हिंदु धर्मग्रंथांबद्दल आस्था वाटूं लागली. एवढेंच नव्हे तर ख्रिश्चन धर्माबद्दलहि त्यांना कुतूहल वाटूं लागलें. अपकाराची फेड उपकारानें करण्याचा येशू ख्रिस्ताचा उपदेश त्यांना आवडला. हिंदु धर्मग्रंथांतहि असलेल्या ह्या उपदेशाशीं त्यांनीं तो ताडून पाहिला.

चार वर्षांनीं ते बॅरिस्टर झाले नि हिंदुस्थानाला परत आले. त्यांनीं राजकोटला प्रॅक्टिस् सुरू केली; पण फारसा जम बसला नाहीं. तेवढ्यांत पोरबंदरच्या एका व्यापारी पेढीनें त्यांना एक वेगळा मार्ग सुचविला. ह्या पेढीची दक्षिण-आफ्रिकेंत शाखा होती. त्या शाखेतर्फे तिथें एक मोठा खटला सुरू होता. बॅरिस्टर ह्या नात्यानें त्यांत मदत करण्यासाठीं गांधीजींना दक्षिण-आफ्रिकेला जाण्याबद्दल विचारण्यांत आलें. गांधीजींनीं तें आमंत्रण स्वीकारलें. एका वर्षासाठीं म्हणून ते दक्षिण-आफ्रिकेला गेले नि वीस वर्षें तिथें राहिले.

त्या मुदतींत त्यांनीं तेथील हिंदी रहिवाशांच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या. सत्याग्रहाचा जन्म प्रथम तिथेंच झाला.

१९१६ सालीं गांधीजी हिंदुस्थानांत आले नि हळूहळू ते राजकारणांत पडले. आतांपर्यंत गांधीजींना ब्रिटिश सरकाराबद्दल थोडाफार आदर वाटत होता; पण आतां तो पार नाहींसा झाला.

ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून घालविलें पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली.

त्याचप्रमाणें हिंदुमुसलमानांतील दुही मिटली पाहिजे, हेंहि त्यांच्या लक्षांत आलें. त्यांनीं त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू केले.

नंतर त्यांनीं खादीचें महत्त्व लोकांना पटवून दिलें.

लोक अनेकदां शांतपणें सत्याग्रह करीत; पण कधींकधीं लोक दंगा करीत. ह्या नि इतरहि कांहीं निमित्तांनीं गांधीजींनीं बऱ्याच वेळां उपास केले. कांहीं उपास लांब मुदतीचे असत. मग इतर पुढारी मध्यस्थी करीत नि उपास सुटत. कधींकधीं सरकारहि गांधीजींच्या इच्छेप्रमाणें मिळतें घेई अन् त्यांना उपास सोडावयास लावी.

१९३० च्या मार्चमध्यें गांधीजोंची सुप्रसिद्ध दांडीयात्रा झाली. सरकारनें मिठावर कर बसविला. म्हणून तो कायदा तोडण्यासाठीं गांधीजी अनेक लोकांसह दांडीला गेले होते.

त्यानंतर लौकरच गांधीजींना पकडून तुरुंगांत घालण्यांत आलें. हा त्यांचा दुसरा तुरुंगवास. मग गांधी-आर्यविन करारानुसार समेट झाला नि गांधीजी सुटले.

नंतर सहा महिन्यांनीं कॉंग्रेसच्या वतीनें ते गोलमेज परिषदेला लंडनला गेले. तिथून परत आल्यानंतर थोड्या दिवसांनीं त्यांना पुनः पकडण्यांत आलें. तुरुंगांत असतांनाच गांधीजींनीं मोठा उपास केला.

हा उपास यशस्वी झाला. गांधीजींच्या सांगण्याप्रमाणें हरिजनांना वागविण्याचें लोकांनीं कबूल केलें. तसा करार झाला नि गांधीजींनीं उपास सोडला. त्यानंतर गांधीजींना पुनः पकडण्यांत

आलें नि १९३३ सालीं त्यांना सोडण्यांत आलें. त्यांनीं आतां हरिजनांचा प्रश्नच मनावर घेतला होता.

१९३४ पासून ते कॉंग्रेस नेत्यांना परत उपयुक्त सूचना देऊं लागले. ह्या सुमाराला हिंदुमुसलमानांतील तेढ वाढूं लागली. गांधीजींनीं मुसलमानांचे पुढारी बॅरिस्टर जिन्हा ह्यांच्याबरोबर वाटाघाटी सुरू केल्या, पण त्या फिसकटल्या.

नंतर एक महत्त्वाची घटना घडली. ती म्हणजे दुसरें जागतिक युद्ध ! आतां सत्याग्रहाच्या चळवळीला फार जोर आला. त्यावेळीं २५००० लोक तुरुंगांत गेले.

मग 'चले जाव' ही घोषणा सुरू झाली. १९४२ मध्यें गांधीजींना पकडलें. त्यांच्याबरोबर कॉंग्रेसचे बहुतेक सर्व पुढारीहि पकडले गेले होते.

सारी जनता तेव्हां चिडून उठली. किती तरी लोकांना तुरुंगांत धाडण्यांत आलें ! पुढें गांधीजींची प्रकृति नादुरुस्त झाली म्हणून त्यांना सोडलें. गांधीजींनीं पुनः बॅ. जिन्हाशीं वाटाघाटी केल्या व पुनः त्या बिनसल्या.

नंतर १९४७ च्या २० फेब्रुवारीला ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून काढता पाय घेण्याचा निश्चय जाहीर केला. त्याप्रमाणें १९४७ च्या ऑगस्टची १५ तारीख स्वातंत्र्यदिन म्हणून साजरी झाली.

मात्र हिंदुस्थानाचे हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन तुकडे झाले ! हिंदुस्थानला स्वराज्य मिळालेलें गांधीजींनीं पाहिलें.

१९४८ साल उजाडलें. देशांत शांतता नांदावी म्हणून गांधीजींनीं उपास सुरू केला. पांच दिवसांनीं त्यांनीं तो सोडला. नंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे जानेवारीच्या ३० तारखेला —पौषाच्या कृष्ण पंचमीला एका माथेफिरूनें त्यांचा वध केला.

गांधीजी हुतात्मा झाले ! रीतसर चौकशी होऊन त्या मारेकऱ्यास फांशीं देण्यांत आलें !

गांधीजींनीं आपल्या देशासाठीं पुष्कळ झीज सोसली. पैशाची नि प्रकृतीची हानि सोसली. म्हणून लोकांनीं त्यांना महात्मा ही पदवी दिली.

महात्मा गांधीजींची जयंति व पुण्यतिथि देशभर मोठ्या उत्साहानें साजरी होते. गांधीजी दररोज संध्याकाळीं देवाची उपासना करीत. बरेच लोक जमत त्यावेळीं. मग भजनें वगैरे म्हटलीं जात.

त्यांतील ' वैष्णव जन तो तेणे कहिये ' हें पद त्यांच्या फार आवडीचें होतें. ' रघुपति राघव राजाराम । पतितपावन सीताराम ' हें भजनहि त्यांना फार आवडे.

त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं हीं दोन्हीं पदें म्हटलीं जातात. महात्माजींचें चरित्र वाचलें कीं, आपल्या देशाच्या इतिहासांतील २५।३० वर्षांच्या घटना कळून येतात. तेव्हां त्यांच्या पुण्यतिथीला त्यांच्या चरित्रांतील महत्त्वाच्या गोष्टींची माहिती अवश्य करून घ्यावयास हवी ! म्हणजे त्यांचें आपल्या देशावरील ऋण थोडें-फार तरी फिटेल.

**सुभाष जयंति**

सुभाषचंद्र बोस ह्यांचा जन्म १८९७ सालीं जानेवारीच्या २३ तारखेला बंगालमध्यें झाला. जानेवारी महिना साधारणपणें पौष महिन्यांत येतो. म्हणून या महिन्यांत सुभाषजयन्ति साजरी करूं या.

लहानपणापासूनच सुभाषबाबु स्वाभिमानी व देशाभिमानी होते. ते अठराव्या वर्षीं इंटरची परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाले.

बी. ए. च्या शेवटल्या वर्षांत असतांना एका इंग्रज प्राध्यापकानें वर्गांत हिंदी लोकांसंबंधीं तुच्छतेचे उद्गार काढले. इतर विद्यार्थ्यांनीं ते निमूट गिळले; पण सुभाषबाबूंनीं त्या प्राध्यापकाच्या तोंडांत भडकावली. अर्थातच त्यांना तें कॉलेज तर सोडावेंच लागलें! पण तिथल्या इतर कॉलेजांतहि त्यांना प्रवेश मिळेना. शेवटीं एका मिशनरी कॉलेजांत त्यांना घेतलें व ते पहिल्या वर्गांत बी. ए. झाले.

नंतर ते विलायतेला गेले आणि आय्. सी. एस्. ची परीक्षा उत्तम रीतीनें पास झाले. त्या काळीं ह्या परीक्षेला मोठा मान होता. त्यांना आतां लठ्ठ पगाराची सरकारी नोकरी मिळणार होती.


पण त्याच वेळेस आपला भारत खडबडून जागा होत होता. गुलामगिरीच्या बेड्या तोडून स्वतंत्र होण्यासाठीं तो धडपडत होता! तरुण मुलांनीं सरकारी शाळा सोडल्या, कॉलेजें सोडलीं, वकिलांनीं वकिली सोडली. हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर पाय ठेवतां ठेवतां सुभाषबाबूंनीं आय्. सी. एस्. चा राजिनामा दिला नि त्यांनीं मातृभूमीची सेवा करण्यास सुरुवात केली.

त्यांची वृत्ति तडफदार व लढाऊ होती. हें ओळखून लोकांनीं त्यांना आपले नेताजी बनविलें.

इंग्रज सरकारनें त्यांना अकरा वेळां तुरुंगांत डांबलें. तिथें त्यांना क्षयरोग जडल्याचें भय दिसतांच त्यांची सुटका करण्यांत येई. शेवटीं अशीच तुरुंगांत त्यांची प्रकृति बिघडली म्हणून त्यांच्या घरींच त्यांना नजरकैदेंत ठेवलें. ह्या मुदतींत सुभाषबाबूंनीं दाढी वाढविली होती. पठाणाचा पोषाक घालून अन् झियाउद्दीन हें नांव घेऊन ते ह्या कैदेंतून निसटले नि पेशावरला पोंचले. मग अफगाणिस्थानांतून ते रशियांत गेले नि तिथून

जर्मनी गांठला ! त्यांनीं तिथल्या आकाशवाणीवरून हिंदी लोकांना संदेश दिला.

जर्मनींत असतांना त्यांनीं आझाद हिंद सेना काढली. ह्याच सुमाराला जपाननें युद्धांत जोर मारला होता. जपानच्या मदतीनें इंग्रजांशीं लढा देण्यासाठीं सुभाषबाबू जपानला गेले. पाणबुडी बोटींतून ९० दिवस प्रवास करून ते जपानमध्यें आल्यावर तेथेंहि त्यांनीं आझाद हिंद सेनेची स्थापना केली. भारताचें स्वतंत्र सरकार त्यांनीं तेथें स्थापन केलें. त्यांनीं मातृभूमि परदास्यांतून मुक्त करण्यासाठीं आझाद हिंद फौजेनिशीं ब्रिटिशांशीं



सशस्त्र लढा दिला. हिंदुस्थानाच्या आंतून व जपान्यांच्या मदतीनें बाहेरून युद्धाचा डोंब उसळून देण्याचा विचार होता त्यांचा. म्हणजे

प्रा. क्र.. जो. पि ...
जि. ... ता. ...

मधल्यामध्यें ब्रिटिश साम्राज्याची राखरांगोळी करून त्यांतून स्वतंत्र भारत निर्माण करावयाचें ! 'आगे बढो ' हें प्रत्येक हिंदी माणसाला त्यांनीं ब्रीदवाक्य दिलें होतें. 'आगे बढो '! पुढें चला ! माघार म्हणून घ्यायची नाहीं ! " जयहिंद " हा भारताचा जय-जयकारदर्शक शब्दहि त्यांनींच निर्माण केला.

शिवाजीमहाराजांसारखे लढवय्ये वीर होते सुभाषबाबू नेताजी ! औरंगजेबाच्या कैदेंतून शिवाजीमहाराज जसे युक्तीनें निसटले तसेच नेताजी नजरकैदेंतून युक्तीनें पसार झाले ! पण भारत स्वतंत्र झालेला पहाणें त्यांच्या नशिबीं नव्हतें !

इंग्रज सरकारला ते भारी वाटत होते. जपान १९४५ सालीं लढाईत शरण आलें. दोनच दिवसांनीं जपानी अधिकाऱ्यांनीं तिथून जाणाऱ्या एका विमानांतून नेताजींची रवानगी केली; पण त्या विमानाला वाटेंत अपघात झाला आणि १८ ऑगस्टला नेताजींचा अपघातांत अंत झाला !

हा अपघात आपोआप घडला कीं शत्रूंनीं मुद्दाम घडविला, तें कळत नाहीं. सुभाषबाबूंचा मृत देह कोणाच्याच नजरेला न पडल्यामुळें ते अजून जिवंत असतील नि केव्हांतरी भारतांत येतील, अशी आशा कांहीं लोक करतात; पण वाईट बातमी क्वचितच खोटी ठरते ! तेव्हां सुभाषबाबू अकालीं व अपघातांत वारले हेंच खरें.

अशा भारतमातेच्या या थोर सुपुत्राच्या चरित्रापासून आपण देशसेवेची स्फूर्ति घेतली पाहिजे.

**प्रजासत्ताक दिन**

पौष महिना म्हणजे सामान्यपणें इंग्रजी जानेवारी महिना. जानेवारीची २६ तारीख प्रजासत्ताक-दिन म्हणून महत्त्वाची मानली

जाते. तेव्हां ह्या सव्वीस जानेवारीची माहिती पौष मासांतच सांगावयाला हवी !

१९२९ सालीं लाहोरला काँग्रेसचें अधिवेशन झालें होतें. त्या वेळीं पंडित जवाहरलाल नेहरू अध्यक्ष होते. त्यांनीं पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव केला अन् २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचें ठरलें. त्याप्रमाणें सबंध देशांत तो दिवस फार उत्साहानें पाळला गेला. त्यानंतर दरवर्षीं हा दिवस पाळला जाई.



पुढें १५ ऑगस्ट १९४७ ह्या दिवशीं आपणांला स्वातंत्र्य मिळालें अन् हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यांत आला.

२६ जानेवारी १९५० ला भारत " प्रजासत्ताक " झाला, तेव्हां सव्वीस जानेवारीला **प्रजासत्ताक दिन** असें नांव दिलें गेलें.

१९४७ सालीं आपल्याला स्वातंत्र्य मिळालें. म्हणजे आपलें घर परक्यांच्या ताब्यांत होतें तें आपल्या ताब्यांत आलें. पण आपला राज्यकारभार जुन्या वळणावरच चालला होता. पूर्वीची अडगळ काढून टाकणें, पडझड दुरुस्त करणें, गिलावा लावणें व नव्या सोयी करणें हीं कामें व्हावयाचींच होतीं.

आपल्या देशाची राज्यघटना तयार करण्यासाठीं घटना समिति बोलावली गेली. त्या घटनासमितीनें २-२॥ वर्षें खपून नवी राज्यघटना तयार केली. राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद त्या समितीचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनीं घटना तयार केली. तींत पुढील महत्त्वाच्या गोष्टी आहेत :—

(१) अस्पृश्यता संपूर्णपणें गेली असें मानणें.
(२) कुठल्याहि जातीसाठीं स्वतंत्र मतदार संघ नसणें.
(३) प्रत्येक वयांत आलेल्या स्त्री-पुरुषाला मताचा अधिकार मिळणें.
(४) राष्ट्रभाषा हिंदी व राष्ट्रलिपि देवनागरी ठरविणें.
(५) दुभतीं व उपयुक्त जनावरें मारावयाला बंदी घालणें.
(६) नागरिक धर्म पाळणाऱ्या कुठल्याहि धर्माच्या माणसाला पूर्ण नागरिकत्वाचे हक्क मिळणें.

२६ जानेवारी १९५० ह्या दिवशीं ही नवी राज्यघटना अंमलांत आली. त्या दिवसापासून आपल्या देशाचें नांव '**प्रजासत्ताक भारत**' म्हणून जाहीर झालें ! लोकांच्या—जनतेच्या—सुखसोयींचा विचार करून राज्यव्यवस्था चालावयाची असा त्याचा अर्थ !

आतां हा प्रजासत्ताकदिन साजरा कसा करावयाचा! आपला देश स्वतंत्र झाला आहे. त्याला सध्यां मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. स्वतंत्र्यासाठीं अनेकांनीं आपापल्या वांटयाचें लहानमोठें कर्तव्य चोख केलें, म्हणून स्वतंत्र भारताचें मंदिर उभारलें गेलें.

कोणी ह्या मंदिराच्या पायाचे दगड होते. कोणी त्या दगडांना जोडणारा चुना होते, कोणी पायऱ्या, तर कोणी भिंती होते. मंदिराची इमारत इतपत घडविली गेल्यानंतर ज्या थोर व्यक्ति भारतांत निर्माण झाल्या त्यांनीं वरतीं कळस बसविला.

अनेक थोर व्यक्तींनीं राष्ट्राकरितां झीज सोसली अन् स्वतंत्रतेची पहांट उगवलेली पहाण्याचें भाग्य मात्र आपल्याला लाभलें! पण हें भाग्य आपण टिकवायला हवें. वाढवायला हवें! त्यासाठीं यत्न करायला हवेत आणि आपणहि थोडीफार झीज सोसायला हवी! तरच आपल्या ह्या थोर देशभक्तांचें ऋण आपण थोडेंतरी फेडूं!

परकीय राजांच्या वंशावळी नि त्यांच्या कारकीर्दी पाठ करण्याचे दिवस आतां गेले. आतां आपल्या देशभक्तांचीं चरित्रें, आपल्या पुढाऱ्यांच्या व मुत्सद्द्यांच्या कारकीर्दी मनावर ठसवायच्या आणि आजच्या मुलांमुलींनीं आपल्या देशाचा इतिहास घडवायचा!

म्हणून ह्या प्रजासत्ताक दिनीं मुलांमुलींनीं स्वतःशीं पुढील संकल्प करायला हवेत, आपल्या रोजनिशींत ते टिपायला हवेत नि आपल्या आचरणांत ते आणायला हवेत! --कीं,

**(१) मीं अगदीं मनापासून विद्याभ्यास करीन.**

**(२) मीं पूर्णपणें घरीं, शाळेंत व समाजांत शिस्त बाळगून वागेन.**

**(३) मीं माझ्या देशाची संस्कृति व घटना ह्यांना मान देऊन वागेन.**

त्याचप्रमाणें प्रत्येकाला आपलीं राष्ट्रगीतें तोंडपाठ आलीं पाहिजेत. त्यांचा अर्थ त्यांनीं नीट कळून घ्यावयास पाहिजे--

संपला हा पौष महिना ! तसा शून्य महिना हा नाहीं, हें पटलें असेल ना तुम्हांला ?

**या पौष महिन्यांत** तिळगुळाची देवाण-घेवाण करून आपण तोंडें गोड केलीं. त्याचप्रमाणें महात्मा गांधी व निवृत्तिनाथ यांच्या पुण्यतिथ्या तसेंच सुभाषचंद्र बोस व विवेकानंद यांच्या जयंत्या आपण या महिन्यांत साजऱ्या केल्या. देशभक्तांच्या चरित्रांपासून आपण देशसेवेची व राष्ट्ररक्षणाची स्फूर्ति घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें संतांच्या चरित्रांपासून आपण परमेश्वराबद्दल निष्ठा, प्राणिमात्राबद्दल आदर, पवित्र आचरण इ. गुण घेतले पाहिजेत. वरील दोन गोष्टी आपण साध्य केल्या म्हणजे या मासापासून आपण खूपच शिकलों असें म्हणतां येईल.

## स्वाध्याय

(१) संक्रान्तीच्या वेळीं गोड बोलावें म्हणून तिळगूळ कां देतात ?

(२) हिंदुधर्माची कीर्ति विवेकानंदांनीं जगभर कशी पसरविली ?

(३) भारताच्या स्वातंत्र्यासाठीं महात्माजींनीं केलेल्या कार्याची माहिती सांगा.

(४) मातृभूमि परदास्यांतून सोडविण्यासाठीं सुभाषबाबूंनीं केलेली महान् कामगिरी कोणती ?

२२६७०
IRBK-0106253
IRBK-0106253